(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व : एक दृष्टीक्षेप

**ज्योती अमित वराळे,** नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स, कोल्हापूर

**प्रा.डॉ.अरुण शिंदे** नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स, कोल्हापूर

---

**गोषवारा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अलौकिक कार्य देशालाच नव्हे तर जगाला प्रेरणादायी ठरले आहे. अस्पृश्य, कामगार, शेतकरी, महिला इत्यादी शोषित वर्गाप्रती त्यांनी दाखविलेले दायित्व विशेष मोलाचे ठरले आहे. त्याशिवाय देशाच्या आर्थिक, राजकीय, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात त्यांचे अतुलनीय योगदान आहे. सामान्यातून असामान्यत्वाकडे नेणारा डॉ. आंबेडकरांचा हा प्रवास त्यांच्या व्यक्तिमत्वाचे गमक होय. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही महत्त्वपूर्ण गुणांमध्ये मानवतावादी व्यापक दृष्टिकोन, योग्य नियोजन कौशल्य, उच्च दर्जाची देशभक्ती, पराकोटीचा आत्मविश्वास, विभूतीपूजेस विरोध, परखड स्वभाव, लढवय्ये व्यक्तिमत्व यांचा समावेश होतो. भारतीय जनतेचे कल्याण साधण्याच्या हेतूने त्यांनी निर्मिलेले भारताचे संविधान ही त्यांची अनमोल देणगी होय. धर्मनिरपेक्ष अशा या संविधानामुळे भारत अखंड राहण्यास हातभार लागलेला आहे. अस्पृश्यतोद्धार हे आपले परम कर्तव्य त्यांनी मानले व त्याचे उच्चाटन करण्यास्तव सुसूत्रपणे नियोजन केले. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना गुलामगिरीची जाणीव करून दिली. त्यांच्यामध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटवून त्यांना शिक्षणासाठी प्रेरित केले. अखिल मानव जातीला समानतेची वागणूक देणारा बौद्ध धम्म आहे हे ओळखून स्वतःसह लाखो अस्पृश्यांचे बौद्ध धम्मात धर्मांतर त्यांनी घडवून आणले. विषमता हा आपल्या देशाला लागलेला कलंक असून त्यामुळे देशाची प्रगती होऊ शकणार नाही हे ओळखून डॉ. आंबेडकरांनी विषमताधारित जातीव्यवस्था नष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यास्तव गोलमेज परिषदेत त्यांनी अस्पृश्यांच्या हक्कांची मागणी करणारा जाहीरनामा प्रसिद्ध केला. आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांच्या हक्कावर पाणी सोडून महात्मा गांधीजींचे प्राण वाचविणारे डॉ. बाबासाहेब खरे देशभक्त होते. त्यांचे कोणतेही वक्तव्य अतिशय आत्मविश्वासाने भारलेले असायचे मग ते संविधानाच्या लवचिकतेबद्दलचे असेल किंवा काँग्रेसमध्ये राहूनही स्वतःच्या अलिप्ततेबद्दल केलेले असेल स्वतःबद्दलचा पराकोटीचा आत्मविश्वास ही त्यांच्यातील दुर्लभ बाब होय. त्यांनी विभूतीपूजेस नेहमीच विरोध केला. कारण बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे असे होते की विभूतीपूजेकडूनच लोक मानसिक गुलामगिरीकडे वळतात व तेथूनच समाजाच्या अध:पतनाचा मार्ग सुरू होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परखड स्वभाव अनेक प्रसंगी दिसून येतो. मग ते ब्रिटिश अधिकारी असो, किंवा गांधीजी व काँग्रेस असो. न पटलेल्या भूमिकेवर नेहमीच परखडपणे डॉ. आंबेडकरांनी टीका केलेली आढळते. अशाप्रकारे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व: एक दृष्टिक्षेप' या शोधनिबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील, त्यांच्या स्वभावातील निवडक व दुर्लभ अनभिज्ञ पैलूंचा आढावा घेतला जाणार आहे.

**प्रस्तावना**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हजारो वर्षे अन्याय अत्याचारात खितपत पडलेल्या अस्पृश्य जातीतून एका क्रांतीसूर्याचा म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. डॉ. आंबेडकरांना आधुनिक भारताचे निर्माते, पहिले मजूरमंत्री, कायदामंत्री, अर्थशास्त्रज्ञ, भारतीय संविधानाचे शिल्पकार, बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवक, विश्वरत्न अशा अनेक बिरुदावलींनी संबोधले जाते. सर्वार्थाने समता, बंधुता, मानवता यावर आधारित समाजरचनेचा डॉ. आंबेडकरांनी पुरस्कार केला. त्यांनी मांडलेली सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक तत्वे देशास प्रगतीपथावर घेऊन जाणारी आहेत. इतक्या असामान्य गोष्टी आपल्या जीवनात घडवून आणणारे डॉ. आंबेडकर हे एक वेगळेच रसायन होते. अशावेळी त्यांचे व्यक्तिमत्व प्रकर्षाने समोर उभे राहते. त्यांचे वाक्चातुर्य, विनयशीलता स्वाभिमानी बाणा, गरिबांविषयीची करूणा, कुशाग्र बुद्धिमत्ता, पारदर्शी राजकारण स्त्रियांविषयीचे दायित्व, हक्कांबाबतचा विद्रोहीपणा हे गुण विशेषत्वाने नजरेत भरतात. अनेक दुर्मिळ गुणांचा मेळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असणे हेच त्यांच्या महानतेला कारणीभूत ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील आश्चर्यचकित करणारे घटनाक्रम सामान्य जनांचे औत्सुक्य वाढवते. अशा या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वातील काही निवडक व दुर्लभ पैलूंवर टाकलेला दृष्टिक्षेप पुढीलप्रमाणे:

1. **मानवतावादी व्यापक दृष्टीकोन** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला अमूल्य अशी संविधानाची देणगी दिली आहे. भारतात विविध जाती- धर्म, पंथ, भाषा यांचे मिश्रण आढळते ; तरीही विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य संविधानामुळेच टिकून आहे. भारतीय संविधानाला बौद्ध धम्माचे, आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान लाभले आहे. व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखणाऱ्या, मनुष्याला विवेकी बनवणाऱ्या, समता, बंधुता व मानवतेने प्रेरित असणाऱ्या तसेच व्यक्तीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक अशा बौद्ध धम्माचे सार कूडीतून प्राण ओतावा तसे डॉ. आंबेडकरांनी या संविधानात ओतले आहे. यामागे डॉ. आंबेडकरांचा मानवतावादी व्यापक दृष्टिकोन दिसून येतो. संविधान हे धर्मनिरपेक्ष आहे ते कोणत्याही धर्माचा पुरस्कार करीत नाही. लोकांनी लोकांसाठी चालविलेल्या नियमबद्ध राज्याचा संविधान निर्देश करते; ज्यामुळे देशातील प्रत्येक क्षेत्राचा बौद्धिक

स्तर उंचावला जाऊन देश प्रगतीपथावर पोहोचेल. आता खरी गरज आहे संविधान अभ्यासकांची; जे सामान्य माणसापर्यंत संविधान पोहचवून त्यास खऱ्या अर्थाने वाचवू शकतील; पर्यायाने लोकशाही व देशालाही वाचवतील.

**2. अस्पृश्यतोद्धाराचे योग्य नियोजन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी अगदी अचूक नियोजन केले होते. व टप्प्याटप्प्याने त्याची अंमलबजावणी ते करत राहिले. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अज्ञानी, अशिक्षित समाजामध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटवली. त्यांना ओंगळवाणे, लाचारीचे जिणे सोडून देऊन स्वद्धोरासाठी पेटून उठण्यास प्रोत्साहित केले. त्यासाठी त्यांना 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' अशी शिकवण दिली. अस्पृश्यता ही आपल्या पायातील बेडी आहे असे ते म्हणत. शहरात खरा विकास आहे हे सांगताना बाबासाहेब म्हणतात, "खेडेगावातील अस्पृश्यांनी तेथून निघून जेथे कोठे पडीक जमीन असेल ती ताब्यात घ्यावी आणि नवीन गावे वसवून स्वाभिमानपूर्वक माणुसकीचे जीवन जगावे. तेथे नवा समाज निर्माण करावा. तेथील सर्व कामे त्यांनीच करावीत अशा गावातून त्यांना कोणी अस्पृश्य म्हणून अपमानास्पद वागणूक देणार नाही."[१] कर्मठ व धार्मिक कर्मकांडाचे वर्चस्व असलेल्या हिंदू समाजात राहून अस्पृश्य समाजाची प्रगती अशक्य तर आहेच शिवाय हिंदू समाजाला आपल्या अस्पृश्य बांधवांविषयी पाझर फुटत नाही हे पाहून अस्पृश्य समाजाचे धर्मांतर करावे असा त्यांनी निश्चय केला. धर्मांतरासंबंधीचे आपले नियोजन सांगताना बाबासाहेब म्हणतात, "आपल्याला आज ना उद्या धर्मांतर करावे लागणारच आहे पण त्यासाठी आधी खोलवर विचार नको का करायला? अहो आत्ताच कुठे मी धर्मांतराची नाव तयार केली आहे. या नावेतून आपली सर्व सात कोटी जनता बसून पैलतीरी जाणार आहे. पण त्या नावेचे सुकाणू हे सर्वस्वी माझ्या हातात आहे. त्यामुळे ही माणसांनी गच्च भरलेली नाव कोठे वादळात सापडू नये, खडकावर आदळू नये, फुटू नये किंवा धोक्यात सापडू नये यासंबंधी अगोदर दक्षता नको का घ्यायला?"[२] अस्पृश्यतोद्धाराच्या योग्य नियोजनाचा आणखी एक भाग म्हणजे बौद्ध धम्माचा धर्मग्रंथ. धम्माला आवश्यक पाया या ग्रंथाधारे लोकांना मिळेल व तो अत्यंत निकडीचा असल्याने डॉ. आंबेडकर 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथ लिखाणात गढून गेले. प्रदीर्घ अशा या ग्रंथाचे काम व प्रकृती अस्वास्थ्य यामुळे धर्मांतर लांबणीवर जाणार हे ओळखून त्यांनी या ग्रंथाविना धर्मांतर केले व आपल्या अनुयायांनाही बौद्ध धम्माची दीक्षा दिली. बौद्ध धर्मग्रंथ बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर प्रकाशित झाला. अशा प्रकारे अस्पृश्य समाजाचा खराखुरा उद्धार डॉ. आंबेडकरांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने साधला आहे व मनुष्य जन्माची अत्युच्च कामगिरी बजावली आहे.

**3. उच्च दर्जाची देशभक्ती**

इ.स १९४७ पूर्वी भारतावर ब्रिटिशांचा अंमल होता. महात्मा गांधींसह अनेक स्वातंत्र्य सैनिक भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी सर्वस्व अर्पण करीत होते. अशावेळी आंबेडकरांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी काय केले? असे बिनबुडाचे आरोप त्यांच्यावर केले जातात. ज्यावेळी भारतीय लोक ब्रिटिश राज्यात स्वतःला गुलाम संबोधित होते त्यावेळी भारतातील सवर्ण वर्ग आपल्याच अस्पृश्य बंधुंवर गुलामगिरी लादत होते, अत्याचार करीत होते, त्यांच्या स्पर्शाचा विटाळ मानत होते. अशावेळी डॉ. आंबेडकर अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी सर्वशक्तीनिशी झटत होते. कारण त्यातच देशाचे हित आहे हे त्यांनी ओळखले होते. लंडन येथे आयोजित पहिल्या गोलमेज परिषदेत आंबेडकरांनी ब्रिटिश सरकारच्या धोरणाबाबत असंतोष व्यक्त केला होता, त्यांना अनेक परखड बोल सुनावले होते. तसेच अस्पृश्यांच्या हक्कांची मागणी करणारा जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. आंबेडकरांच्या या कामगिरीविषयी धन्यवाद देताना संडे क्रोनिकल पत्र म्हणाले की, "आंबेडकर हे हाडाचे राष्ट्रभक्त आहेत. कट्टर साम्राज्यवादी ब्रिटिश मुत्सद्यांच्या लाघवी भाषणाला न भुलता आपली खरी राष्ट्रीय वृत्ती ढळू न देण्यासाठी त्यांना अनेक प्रकारच्या मोहांशी झगडावे लागले आहे."[३] आंबेडकरांचे भाषण ऐकल्यानंतर महात्मा गांधींनीही त्यांना 'उच्च दर्जाचे देशभक्त' म्हटले होते. पिढ्यानपिढ्या सवर्णांकडून अस्पृश्यांचा छळ झाला तरी बाबासाहेबांनी याविषयी नेहमीच संयम बाळगला आहे. स्वतः डॉ. आंबेडकर याबाबतीत म्हणतात, "जरी माझा स्वभाव तापट असला आणि सत्ताधारी लोकांशी अनेक प्रसंगी खटके उडालेले असले तरी मी भारताविषयी परदेशात काही कडवट बोलेन असा चुकीचा ग्रह त्यांनी करून घेऊ नये. मी देशाशी केव्हाही विद्रोह केला नाही. देशाचे हितच हृदयात सतत बाळगले. गोलमेज परिषदेच्यावेळी देशाच्या हिताच्या दृष्टीने मी गांधीजींच्याही पुढे २०० मैल होतो."[४] ज्या अस्पृश्यतोद्धारासाठी आंबेडकरांनी जीवाची बाजी लावली होती ते अस्पृश्यांचे हक्क दृष्टीपथात आले असता महात्मा गांधींनी आमरण उपोषण सुरू केले. भारतभरातून त्यावेळी आंबेडकरांवर दबाव टाकला जात होता. अशावेळी आपल्या करोडो अस्पृश्य बांधवांच्या हक्कावर आंबेडकरांना पाणी सोडावे लागले. 'गांधीजींचे प्राण वाचवून डॉ. आंबेडकर महात्मा ठरले' असे धनंजय कीर यांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे. अशा अनेक प्रसंगातून डॉ. आंबेडकरांच्या प्रखर देशभक्तीची झलक दिसते.

**४)पराकोटीचा आत्मविश्वास**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वभावातील एक अतिशय दुर्लभ गोष्ट म्हणजे त्यांचा स्वतःवरील पराकोटीचा आत्मविश्वास. बाबासाहेबांचे कोणतेही वक्तव्य मग ते कोणत्याही प्रसंगीचे असो अतिशय आत्मविश्वासाने भारलेले असायचे. त्यांचे आव्हान

स्वीकारणे हेही एकप्रकारचे आव्हानच असायचे. असे आव्हान देण्यासाठी ज्ञानाचे फार मोठे धैर्य लागते. ज्ञानाची ही पुंजीच त्यांचे संचित होती. त्यामुळे अनेकांना ते गर्विष्ठ, उग्र व तापट स्वभावाचे वाटायचे. डॉ. आंबेडकरांना त्यांनी निर्मिलेली राज्यघटना अतिशय प्रिय होती. तिच्या लवचिकपणाबद्दल अभिमानाने बोलताना ते म्हणतात की, "घटना दुरुस्त करण्यासंबंधी जी तरतूद करण्यात आलेली आहे, तिजकडे कोणीही लक्ष पुरवावे. ही शेवटची घटना आहे, असा शिक्कामोर्तब तिजवर केलेला नाही. याउलट घटनेमध्ये सुधारणा करण्यासाठी सहज वळणाची तरतूद केलेली आहे. या परिस्थितीत कोणत्याही राष्ट्राच्या घटना कमिटीने सुधारणास एवढी सुलभ घटना तयार केली असल्याचे कोणीही सिद्ध करावे, असे माझे आव्हान आहे."[५] डॉ. आंबेडकरांना काँग्रेस पक्ष प्रभावित करू शकला नाही. सत्ताधारी पक्षाचे विरोधक म्हणून आंबेडकर काँग्रेस पक्षाच्या धोरणांवर वेळोवेळी टीका करत असत. पण ज्यावेळी खुद्द नेहरूंनी कायदेमंत्रीपद आंबेडकरांना देऊ केले; त्यावेळी आपल्या अनुयायांनी आपल्याबद्दल गैरसमज करून काँग्रेसमध्ये सामील होऊ नये यासाठी आत्मविश्वासपूर्वक त्यांना पटवून देताना आंबेडकर म्हणतात, "मी मध्यवर्ती सरकारला जाऊन मिळालो आहे काँग्रेस पक्षाला नव्हे. आपल्या स्वार्थासाठी काँग्रेस मंत्रिमंडळात मंत्र्याची जागा घेतली नाही. मंत्री झालो म्हणून मी आपल्या मार्गापासून रेसभरही ढळणार नाही. ही अशी शीला आहे मी तलावात असो वा समुद्रात असो मला कोणतेही पाणी वाहून नेऊन बुडवू शकणार नाही….. परंतु तुम्ही मात्र काँग्रेसमध्ये गेलात तर ढेकळा प्रमाणे विरघळून जाल, म्हणून तुमची संघटना अलिप्त आणि अभंग ठेवा."[६] या आंबेडकरांच्या स्वतःवरील आत्मविश्वासामुळेच ते नेहमीच अभंग राहिले.

## 5. विभूतीपूजेस विरोध

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारताचे फार मोठे नेते होते. अस्पृश्य समाजाचा ऊर त्यामुळे अभिमानाने भरून येई. बाबासाहेबांचा प्रत्येक शब्द या समाजाने प्रमाण मानला. अस्पृश्य समाजाचे डॉ. आंबेडकर तारणहार ठरले. अज्ञानी, अशिक्षितच नव्हे तर शिकलेला समाजही आंबेडकरांना परमेश्वराच्या रूपात पाहू लागला. हिंदू धर्माचा त्याग केल्याने धर्मांतरित बौद्ध समाजाला बुद्ध जयंती सोडली की विशेष सणवार नाहीत. पण डॉ. आंबेडकरांचा जन्मदिवस हा अस्पृश्य समाजाच्या सणाचा दिवस, आनंदाचा दिवस. आंबेडकर हयात असताना त्यांची जयंती त्यांच्या समक्षच साजरी केली जायची हे विशेष. पण डॉ. आंबेडकर या विरोधात होते. आंबेडकरांनी आपल्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त अनुयायांना संदेश देताना उद्गार काढले की, "आपल्या या हिंदुस्तान देशांमध्ये राजकीय पुढाऱ्याला अवतारी पुरुषाप्रमाणे मान दिला जातो ही दुर्दैवाची गोष्ट आहे. हिंदुस्थानाबाहेर केवळ महापुरुषांच्याच जयंत्या साजऱ्या केल्या जातात. पण हिंदुस्थानात अवतारी पुरुष व राजकीय पुरुष या दोघांचेही जन्मदिवस पाळले जातात. हे असे असावे ही दुःखाची गोष्ट आहे. व्यक्तीशः माझा वाढदिवस साजरा व्हावा हे मला मुळीच आवडत नाही. मी लोकशाहीचा कट्टर पुरस्कर्ता आहे. मला विभूती पूजा कशी आवडेल. विभूती पूजा हा लोकशाहीचा विपर्यास आहे."[७] डॉ. आंबेडकर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी धर्मांतर सोहळयाआधी सकाळी नागपूरच्या भव्य पटांगणावरील स्टेजवर निवांत बसले होते. त्यावेळी तेथे काही पत्रकारही उपस्थित होते. बाबासाहेब खुर्चीत बसून पेपर वाचनात गर्क झाले असता काही पुरुष, स्त्रिया येऊन बाबासाहेबांच्या पायाला नकळत हात लावून जात होते. जे बाबासाहेबांना माहीत नव्हते. थोड्या वेळाने सहजच पेपरचे पान पलटताना स्त्री-पुरुषांची भलीमोठी रांग त्यांना दिसली जी त्यांच्या पाया पडण्याकरता लागलेली होती. तेव्हा चटकन आपल्या जवळील काठी घेऊन बाबासाहेब त्यांना मारायला धावले. ही गोष्ट एका पत्रकाराने पाहिली. तेव्हा त्याने बाबासाहेबांना याचे कारण विचारले, बाबासाहेब तुम्हाला हे लोक देव मानतात आणि तुम्ही त्यांना मारायला का धावलात? तेव्हा बाबासाहेब उदगारले, 'हेच तर मला नको आहे. मला हे लोक देव मानायला लागले की माझ्या विचारांना ते विसरतील आणि पूर्वीप्रमाणेच अज्ञानी, अविवेकी बनतील.' विभूतीपूजा समाजासाठी किती घातक आहे हे सांगताना आंबेडकरांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो.

## ६)परखड स्वभाव

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महत्त्वाचे स्वभाववैशिष्ट्य म्हणजे त्यांचा परखड स्वभाव. इतरांना सुखावण्याकरता गोड बोलून स्वतःच्या तत्वांशी प्रतारणा करण्याचा स्वभाव त्यांचा कदापिही नव्हता. याउलट समोरचा दुखावला तरी चालेल पण आपली आग्रही भूमिका त्या व्यक्तिसमक्ष मांडण्याचे असामान्य धैर्य त्यांच्यात होते. लाहोर येथील जातपात तोडक मंडळांने त्यांच्या वार्षिक परिषदेचे अध्यक्ष स्थान आंबेडकरांनी भूषवावे अशी त्यांना विनंती केली होती. यावेळी आंबेडकरांनी लिहिलेल्या भाषणातील काही मुद्द्यांविषयी काटछाट करण्यास मंडळाच्या सचिवांनी त्यांना सुचवले. यावर आंबेडकरांनी या भाषणातील स्वल्पविरामही बदलणार नसल्याचे स्पष्ट शब्दात सांगितले. आणि अतिशय परखडपणे म्हणाले, "मला गुळमळीत शब्द वापरणे आवडत नाही. माझे रोखठोक उत्तर असे आहे की जर मंडळ सोयीनुसार माझ्या भाषणात काटछाट करण्याचा आग्रह धरत असेल तर मलासुद्धा ती परिषद रद्द झालेलीच आवडेल. आपल्याला माझा निर्णय कदाचित आवडणार नाही परंतु परिषदेचे अध्यक्ष पद भूषवण्याच्या सन्मानाखातर आपले भाषण तयार करण्यात प्रत्येक अध्यक्षाला हवे असलेले स्वातंत्र्य मी गमावू शकत नाही… प्रश्न तत्वाचा आहे आणि त्यात कोणत्याही प्रकारे तडजोड होईल असे काही करता कामा नये असे मला वाटते."[८] डॉ. आंबेडकरांचे गांधीजींची वैचारिक मतभेद होते. गांधींनी व काँग्रेसने अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे जे वारंवार दुर्लक्ष केले होते त्यावर

बाबासाहेबांनी आगपाखड केली. अशाच एका प्रसंगी गांधीभेटीत डॉ. आंबेडकर गांधीजी व काँग्रेसवर टीका करताना त्यांना म्हणाले, "मला असे वाटते की काँग्रेसला स्वतःच्या कार्यक्रमाबाबत निष्ठा नाही. तसे असते तर काँग्रेस सभासदत्वासाठी जशी खादीची अट ठेवली तशी अस्पृश्यता निवारणासंबंधीची अट ठेवली असती. ज्याच्या घरात अस्पृश्य स्त्रिया अथवा पुरुष नोकरीला नाही, जो एका अस्पृश्य विद्यार्थ्यांचे पालन करत नाही किंवा आठवड्यातून एकदा अस्पृश्य विद्यार्थ्याला पंगतीला बसवत नाही अशांना काँग्रेस सभासद होण्यास बंदी घातली असती तर आज हे हास्यास्पद दृश्य दिसते ते पाहायला मिळाले नसते.... महान नेते आणि महात्मा यांच्यावर आमची श्रद्धा नाही"[९]. अशाप्रकारे आंबेडकरांनी आपल्या शब्दांच्या घणाघाती फैरीने गांधीजींच्या महात्म्यपणाचे पोकळ बुडबुडे फोडून अस्पृश्य जीवनाचे रखरखीत वास्तव त्यांना दाखवले.

**7. लढवय्ये, व्यक्तिमत्व**

डॉ. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व हे लढवय्या वीर पुरुषाचे होते. अनुयायांना फक्त आदेश देणे किंवा शब्दजंजाळात त्यांना गुरफटवून ठेवणे हे आंबेडकरांना कधी जमले नाही. तर न्याय्य हक्कासाठी संघर्ष कसा करावा हे विविध सत्याग्रहातून त्यांनी दाखवून दिले. अन्याय्यी गोष्टीवर डॉ. आंबेडकर ढाण्या वाघासारखे तुटून पडत. ते स्वतःच म्हणत, 'हक्क दे गं माय' म्हणून मिळत नसतात.' नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रहात अटीतटीचा प्रसंग येऊ शकतो आणि बाबासाहेबांच्या जीविताला धोका होऊ शकतो म्हणून सर्व अनुयायी प्राण कंठाशी आणून बाबासाहेबांना सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी गयावया करीत होते. पण आपल्या कार्यकर्त्यांचा जीव धोक्यात घालून आपणास देऊ केलेले संरक्षण डॉ. आंबेडकरांनी नाकारले. 'जे तुमचे होईल तेच माझे होईल' असे म्हणून बाबासाहेब कार्यकर्त्यांसोबत रणांगणात एखाद्या तेजस्वी योद्धाप्रमाणे झुंजत राहिले. पळपुटी भूमिका त्यांना कधीच पसंत पडली नाही. डॉ आंबेडकर मजूरमंत्री असताना एका प्रसंगी कामगारांनी संप पुकारला होता. त्यावेळी कामगार आक्रमक झाले असता खुलेपणाने कामगारांसमवेत वावरण्यावर अनेकांनी त्यांना चेतावणी दिली ; पण आपल्या जीवाची पर्वा करत स्वस्थ बसण्यापेक्षा काय होईल ते होवो म्हणत डॉ. आंबेडकर बाहेर पडले, कामगारांच्या समस्या सोडवत राहिले. अशा प्रकारच्या त्यांच्या लढाऊ, झुंजार नेतृत्वामुळेच भारतातील कोट्यावधी जनतेच्या गळ्यातील ते ताईत बनले. अशाप्रकारे आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वातील विविध अलौकिक स्वभावगुण दृष्टीपथात येतात. ज्यामुळे त्यांच्या असामान्यत्वाची खात्री पटते.

**निष्कर्ष**.

१.अखिल मानव जातीचे कल्याण साधणे हा डॉ. आंबेडकरांचा जीवन विषयक दृष्टिकोन होता. २. योग्य नियोजन कौशल्याच्या आधारे कोणत्याही जटिल समस्येचा अंत करता येतो.

३. अहिंसक मार्गानेही क्रांती करता येते.

४.देशातील समस्या सोडवणे हेच खऱ्या देशभक्ताचे लक्षण होय.

५.मनुष्याने आपल्या ज्ञानाचा व सद्गुणांचा वापर समाजासाठी करावा.

**संदर्भ**

१. माझी आत्मकथा - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संपा. ज.गो.संत, विश्वभूषण प्रकाशन प्र.आ. ६ डिसेंबर २०१५, नवी मुंबई पृ.१०४.

२. तत्रैव -१०९

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर- धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौ. आवृत्ती, ६ डिसेंबर २००६.

४. उनि -पृ.९७

५. उनि – पृ. ८६,

६.उनि -पृ. ९३ पृष्ठ.

७.उनि- पृ११७

८.जातीव्यवस्थेचे निर्मूलन- डॉ. बी. आर. आंबेडकर, उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, तृ. आ. १९४५

९.उनि- पृ.६२